# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००७१६/२०/अ. क्र. ५९९/२३/०१**

**श्री. राम प्रकाश राय**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी, जी/उत्तर विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, खोली क्र. ३७,
१ला मजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, खोली क्र. ३७,
१ला मजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०६.२०२३**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.१०.२०१९ | ०२.११.२०१९ | ०९.१२.२०१९ | २०.०१.२०२० |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०५.०२.२०२० रोजीच्या अर्जान्वये माहिती न मिळाल्याबाबत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. ०३.१०.२०१९ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

"साई सहकारी एकता कॉ.ऑ.हौ.सोसायटी मधील मुत्तु स्वामी यांनी त्यांचे झोपडयाचे पात्रतेबाबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रति मिळणेबाबत."

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि.०२-११-२०१९ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.२०-०१-२०२० संलग्न केले आहेत.

**जन माहिती अधिकारी यांनी दि.०२-११-२०१९ रोजी खालीलप्रमाणे उत्तर दिले :**

"आपला दि.०४.१०.२०१९ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये केलेला अर्ज कृपया संदर्भित सदर अर्जात नमूद श्री. मुतु स्वामी यांचे नाव श्री साई सहकार एकता डॉ. आंबेडकर नगर

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००७१६/२०/अ. क्र. ५९९/२३/०१**

एस. आर. ए. को. . हौ.सो. च्या परिशिष्ट-२ मध्ये सर्व्हे क्र.१५२ वर नमूद आहे. तसेच त्यांनी पुरावे सादर केलेले दिसून येत नाही. सदर परिशिष्ट-२ मध्ये नाव समाविष्ट असल्याबाबतची प्रत सोबत जोडण्यात येत आहे."

**प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२०-११-२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले :**

"अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार कायदा नियमानुसार सादर केलेल्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने अपिलार्थी असमाधानी असल्याचे निदर्शनास येते. जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन अभिलेखानुसार उपलब्ध माहिती अपिलार्थी यांच्या देण्यात आलेल्या उत्तराबरोबर पाठविल्याचे सुनावणी दरम्यान सांगितल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थी कोणतीही माहिती देव नाही. उपरोक्त आदेश पारित करुन, अपीलार्थीनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेला अपील अर्ज निकाली काढण्यात येतो."

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी सादर केले की, श्री.मुत्तु स्वामी ज्याचे नांव परिशिष्ट-२ मध्ये आहे ते चुकीचे आहे.

विचारलेवर अपिलार्थी यांनी सादर केले की, परिशिष्ट-२ मधून नांव वगळणेबाबत अप्पर जिल्हाधिकारींकडे अपिल दाखल करण्यात आलेले नाही. परिशिष्ट-२ मध्ये पात्रता चुकीची झाली असली तरी त्याच्या विरोधात अप्पर जिल्हाधिकारींकडे अपिल दाखल करण्याची तरतूद आहे. अपिलार्थींनी त्याचा वापर करावा. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission ★ Maharashtra ★

**मुंबई**
**दिनांक : १६.०६.२०२३**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**